# मराठी भाषेतील रणधुमाळी

भाषा म्हटली की शब्द आले. त्यांचे अर्थ, शाब्दिक कोट्या विनोदासाठी, शाब्दिक क्लृप्त्या भाषेच्या सौंदर्यासाठी. नवीन शब्द भाषा अधिकाधिक परिपूर्ण बनवतात. पण मुळातच जे शब्द गेली कित्येक वर्षे आपण वापरत आहोत त्यांच्या व्युत्पत्तीबद्दल बरेच संदर्भ मिळतात.

रण हा शेवट असलेले शब्द जेव्हा मी वाचू लागले, वापरू लागले तेव्हा मनात प्रश्न उत्पन्न झाला की ह्या रणाचा शब्दाच्या अर्थाशी कसा संबंध असेल?

राजकारण म्हटले की किमान दोन पक्ष आले, त्यांच्यात रण माजल्याशिवाय सत्ता कशी मिळेल? अकारण, निष्कारण, विनाकारण काहीतरी घडते आणि त्यावर आपण वादविवाद करून चांगलेच रणकंदन माजवतो. माझी पद्धत, आमचे मसाले, आमची खास चव यांच्याबरोबर हातघाईवर येऊन आणि सासुबाईंच्यावर सरशी, सुनेला शह देऊन सुगरण होता येते. मुलाने माझ्या आईच्या हाताची चव तुझ्या स्वयंपाकाला नाही म्हटले की आईचा आविर्भाव युद्ध जिंकल्याचाच असतो.

मंगळागौरीचे जागरण, मुलांसाठी केलेले जागरण, वयपरत्वे झोप येत नाही म्हणून होणारे जागरण, दुसऱ्या दिवशी कामाच्या वेळी झुंजायलाच लावते. त्यातून प्रकृती पित्तकर असेल तर पाहायलाच नको. मुलांच्या बरोबर वाद घालताना रात्र रात्र केलेल्या जागरणाचा उल्लेख हमखास होतोच. वय आणि प्रकृती यांच्या बरोबरच्या युद्धात जागरणाची सरशी ठरलेलीच. मंगळागौरीच्या जागरणात नवपरिणीत दाम्पत्याची विरहाची हुरहुर मात्र त्यांच्या मिलनाच्या उत्कट क्षणीच संपते.

नवजात शिशुपासून ते वृद्धापर्यंत कोणालाही “का” विचारा? नवजात शिशु का रडतो? पासून वयात आलेली मुले अशी का वागतात? माणसं म्हातारी झाली की का बदलतात? कशाचंही कारण जाणण्याचा प्रयत्न करा, युद्धाला तोंड लागलंच समजा. कारण विचारलं तर प्रथम येतो तो संशय, नंतर उभी राहते जिज्ञासा.

कर्जाला कारण आणि तारण दोन्हीची गरज असते. तारण द्या. को-साईनर शोधा. पूर्वी मराठी माणसाने कर्ज घेतले की तो बुडाला, ऋण काढून सण कशाला? अशा चर्चा करून इतर लोक त्याच्या विरूद्ध रण उठवायचे. कर्जाला कारण देऊन, तारण देऊन मरण मात्र ओढवून घेतले की काय? असेच त्याला वाटू लागायचे.

सध्याचा चर्चेत असलेला शब्द म्हणजे ‘पर्यावरण’. पर्यावरण संभाळा, पर्यावरणाचा तोल साधा वगैरे.

पर्यावरण पर्यावरण त्याच चर्चा तेच चर्वण
बेरजेच्या राजकारणापासून युतीच्या जुटीपर्यंत
जुन्या प्रकल्पांच्या चौकशीपासून
नवीन प्रकल्पाच्या उद्घाटनापर्यंत
पर्यावरण पर्यावरण त्याच चर्चा तेच चर्वण

एकंदरीत काय लेखक, कवी आपली सृजनशीलता शब्दांची पखरण करून सिद्ध करतात. वाचक आपल्या आवडीप्रमाणे त्याचे विवरण करून साहित्याचा आस्वाद घेतात.

अशी ही आपली मुलुखमैदान रणरागिणी मराठी भाषा आपल्या सर्वांच्या भावविश्वाला स्पर्श करते. तिने इतर भाषेतील शब्दांना आपलेसे करून घेतले आहे. इतकेच नव्हे तिने आपल्या लेकरांना, इतर भाषकांना आपल्या मातीत सामावून घेण्याची सद्बुद्धीही दिली आहे.

**पद्मिनी दिवेकर**